**CERTIFICATE UNDER BOMBAY REGULATION ACT.**

**IN THE COURT OF CIVIL JUDGE, JUNIOR DIVISION, PEN AT : PEN.**

**(Presided over by- Meghana Ashish Deshmukh)**

**Civil Misc.Application No.01/2018.**

To,

1. Smt.Gulab Dhaya Veer
   Age.45 years, Occ. House wife ....Applicants.

2. Kum.Komal Dhaya Veer
   Age.23 years, Occ. Service

3. Kum.Tejaswee Dhaya Veer
   Age.21 years, Occ. Education

4. Kum.Kanishka Dhaya Veer
Age.8 years, Occ. Education
All are residing at ShantiNiketan .... Applicants.
Society, Chinchpada, Tal.Pen,
Dist.Raigad.
Applicant no.1 is guardian of
applicant no.4.

Vs

Nil ... Respondent.

WHEREAS you applied on 01/01/2018 for getting heir ship certificate under Bombay Regulation Act, 1827.

Whereas, deceased Dhaya Raya Veer died on 28-03-2017 at Nayar Hospital Mumbai and applicants have applied to this court to be formally recognized as legal heirs of said deceased Dhaya Raya Veer.

Whereas, the usual proclamation and Public notice are duly published, but nobody has appeared and offered any sufficient objection for recognation of applicant as legal heirs and for issuance of certificate in their favour. Therefore, applicants are entitled for the certificate.

This certificate is accordingly granted to you applicant as legal heirs of deceased Dhaya Raya Veer on the payment of requisite court fees as per rules.

**NOTE :-** "The person to whom this certificate is granted, or his representative, is required, within six months from the date of his certificate, or within such further time as the Court may

from time to time appoint, to exhibit in Court a full and true inventory of all the property and credits in his possession under this certificate, and also, within one year from the same date or within such further time as the Court may from time to time appoint, to render to the Court a true account of the said property and credits, showing the assets which have come to his hands and the manner in which they have been applied or disposed off."

If you fail to do this, will be liable to punishment under Section 176 of the Indian Penal Code in accordance with Section 317 and 390 of the Indian Succession Act, XXXIX of 1925.

Given under my hand and seal of the court.

This 09 February, 2018.

Pen, (Meghana Ashish Deshmukh )
Dated: 09/02/2018 Civil Judge, J.D., Pen.

**टिप** :- ''सदर प्रमाणपत्र हे कोणत्याही जंगम अथवा स्थावर मिळकतीच्या हस्तांतरणाकामी अर्जदारांना वापरता येणार नाही.''

## दिवाणी चौकशी अर्ज कमांक ०१/२०१८ मधील निशाणी १ वरील आदेश

१. अर्जदार यांनी मुंबई नियंत्रण कायदा १८२७ (थोडक्यात सदर कायदा असे संबोधले आहे.) चे कलम VIII अन्वये वारस दाखला मिळणेसाठी प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे. दाखल कागदपत्रे व अभिलेख पडताळले. अर्जदारांतर्फे वकिलांचा युक्तिवाद ऐकला. कोणीही हजर होऊन प्रस्तुत अर्ज आव्हानित केला नाही.

२. अर्जदारांतर्फे वकीलांनी सांगितले की, अर्जदार क्र.१ चे पती व अर्जदार क्र.२ ते ४ चे वडील कै.धाया राया विर यांचा मृत्यू दि.२८.०३.२०१७ रोजी नायर रूग्णालय मुंबई येथे झाला. मयत कै.धाया राया विर यांचे पश्चात अर्जदार हेच केवळ त्यांचे एकमेव वारस आहेत. अर्जदार यांनी कै.धाया राया विर यांचा मृत्यू दाखला दाखल केला आहे.

३. प्रस्तूत अर्जास हरकत मागविणेकरिता, दिनांक ०४/०१/२०१८ रोजी जाहीरनामा (नि.१०) व जाहीर नोटिस (नि.९) प्रसिध्द केले आहेत. दिनांक २५/०१/२०१८ रोजीच्या बजावणी अहवालानुसार जाहीरनामा हा सदर कायदयातील तरतुदीनुसार मयत यांचे राहण्याचे ठिकाणचे दर्शनी भागावर, पेण नगरपरिषदेच्या सूचनाफलक यावर डकवून योग्यरित्या बजावणी केली आहे. तसेच, अर्जदार यांनी दिनांक ०५/०१/२०१८ रोजीचे " रायगड वृत्तवेध " या दैनिक वृत्तपत्रामध्ये जाहीर नोटिस (नि.७) प्रसिध्द केली आहे. जाहीरनामा (नि.८) व जाहीर नोटिसची योग्यरित्या बजावणी होऊनही अर्जदार हे वारस आहेत व त्यांची मागणी इ. याविरुध्द कोणीही व्यक्तिश: अथवा वकिलांमार्फत उपस्थित राहून हरकत घेतली नाही.

४. अर्जदाराने अर्जातील कथनांचे पुष्ठयर्थ पुरावा प्रतिज्ञापत्र (नि.११) दाखल केले आहे. प्रस्तुत अर्जास विहित मुदतीत अथवा तद्नंतर कोणीही उपस्थित होऊन हरकत उपस्थित केली नाही. अर्जदाराने सांगितले की, त्यांनी वारस दाखला मिळणेकरिता अन्य कोणत्याही न्यायालयात अन्य कोणताही अर्ज दाखल केला नाही. अर्जदार यांचा साक्षीपुरावा विना-आव्हानित राहिला आहे. अर्जदार हे मागणीप्रमाणे वारस दाखला मिळणेस पात्र आहेत. मात्र अर्जदारने सदर अर्जात वारस दाखला नक्की कोणत्या कारणासाठी पाहिजे याबाबतचा

खुलासा केलेला नाही, तसेच कोणत्याही स्थावर अथवा जंगम मालमत्तेचे वर्णन



देखील दिलेले नाही. त्यामुळे वारस दाखल्यावर तो कोणत्याही मिळकतीचे हस्तांतरणाकामी वापरता येणार नाही अशी टिप टाकण्यात यावी. सबब, या सर्व बाबी विचारात घेता, खालीलप्रमाणे आदेश करत आहे.

## **आदेश**

१. अर्ज मंजूर केला आहे.

२. अर्जदारांचे नावे मागणी केलेप्रमाणे वारस दाखला देण्यात यावा.

पेण
तारीख : ०९/०२/२०१८.

(मेघना आशिष देशमुख)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पेण.

<u>टिप</u> :- **''सदर प्रमाणपत्र हे कोणत्याही जंगम अथवा स्थावर मिळकतीच्या हस्तांतरणाकामी अर्जदारांना वापरता येणार नाही.''**